भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ७७६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २०/११/२०१७

**१) ज्वेलरी दुकानातुन सोन्याचे दागीण्याची चोरी . :-**

दिनांक १८/११/२०१७ चे १२.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचे वडील वसंतभाऊ सोनी हे स्वत:चे ज्वेलरी दुकाना मध्ये दोन अज्ञात गिऱ्हाहीकाला सोन्याचे लॉकेट दाखवित असतांना त्यापैकी एका व्यक्तीने सोन्याचे लॉकेट १२ नग वजन १३ ग्रॅम, किंमती ३०,०००/-रु. चे कार्डसह वजन २०,६०० मिली ग्रॅम, चोरुन नेल्याने दुकानाचे सीसीटीव्ही फोटो पाहुन चोरी झाल्याची खात्री केल्याने फिर्यादी धमेन्द्र वंसतभाऊ सोनी वय ४२ वर्ष, रा. राजेन्द्र वार्ड तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९,३४ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. उबाळे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

२) चारचाकी वाहनाच्या धडकेत एक जखमी :-

दिनांक १२/११/२०१७ चे ०९.०० ते १९/११/२०१७ पर्यत यातील जखमी फिर्यादी बळीराम मोतीराम काचीवार वय ६० वर्ष, रा. कोसमतोंडी जि. गोंदिया हा विलास भोजराम लांजेवार रा. मुंडीपार याचेकडील दुचाकी क्रमांक एमएच ३५/ एक्स ८६४८ वर मागे डब्बल सिट जात असता आमगाव कडुन भरधाव वेगाने येणाऱ्या आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील चारचाकी पिकअप वाहन हयगयीने, निष्काळजीपणे चालवुन दुचाकीला खैरी शेतशिवार आमगाव फाटा येथे धडक दिल्याने फिर्यादीसह मोटार सायकल चालक विलास यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने तसेच अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने गुन्हयातील जखमी फिर्यादी हा आज रोजी पोस्टेला हजर होवुन तोंडी तक्रार व डॉक्टरी रिपोर्ट वरुन रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७,३३८ भा.दं.वी. सहकलम १८४,१३४(ब)मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गोडंगे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) ईनोव्हा गाडी चालकांच्या निष्काळजीपणामुळे स्कार्पीओ गाडी धडक दिल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक १९/११/२०१७ चे १४.५० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा आपली स्कार्पीओ गाडी क्र. एमच ३६/००४२ ने भंडारा वरुन नागपुर कडे जात असतांना यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीने चालवुन फिर्यादीचे गाडीला खरबी येथे धडक दिल्याने फिर्यादी पो. शि. शंकर रामकुमार आनंद यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९ भा.दं. वी. सहकलम १८४/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सोडगीर पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**४) जुन्या वादावरुन भांडण व शिवीगाळ करुन हाताबुक्यांनी मारहान करुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १९/११/२०१७ चे १७.०० वाजता. दरम्यान यातील गावामधील बाजार चौकात मंडई निमीत्त दंडारीचा कार्यक्रम असतांना त्या कार्यक्रमामध्ये फिर्यादीचा भाऊ महेश मन्साराम फुंडे वय २३ वर्ष, रा. निघवी हा पानटपरीच्या शेजारी बसला असतांना आरोपीने त्याला पाहताच ग्राम पंचायत चे जुने वादावरुन तु मला शाब्दीक शिवीगाळ का केला? असे संशय धरुन कोणतेही कारण नसतांनी फिर्यादीचे भावा सोबत, लाबाझोंबी करुन शिवीगाळ करुन हाताबुक्यांनी तोंडावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी बबब्बु मन्साराम फुंडे वय २९ वर्ष, रा. निघवी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२५,५०४ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. बावने पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**५) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १९/११/२०१७ चे १५.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील आटो हा आंधळगाव बस स्थानक येथे आमरोडवर येणा—या जाणा—या वाहुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोहवा. बाभरे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बाभरे पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**६) ईलेक्ट्रीक शॉक लागुन तरुणाचा मृत्यु .:—**

दिनांक १९/११/२०१७ चे १०.०० वाजता दरम्यान यातील मृतक प्रणय प्रदीप घरडे वय २४ वर्ष, रा. लोणारा हा लाईनमेन असुन फिर्यादीचे शेतीला पाणी देण्याकरीता डि.वो. तार लावण्यास फिर्यादी सोबत जावुन डी. पी.वर डि.ओ. तार लावुन खाली उतरत असता ईलेक्ट्रीक शॉक्र लागुन खाली पडल्याने मृतक यास उपचार कामी दवाखाण्यात नेत असता रस्त्यातच मरण पावल्याने फिर्यादी सतिश सुखदेव घरडे वय ३२ वर्ष रा. लोणारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जा.फौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. बिसने पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**७) जळाल्याने औषधोपचारा दरम्यान मुलीचा मृत्यु .:—**

दिनांक १९/११/२०१७ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील मृतक कु. मेघा दामोधर गभणे वय १७ वर्ष, रा. निर्वाण मोहल्ला लाखणी ही दिंनाक २७/१०/२०१७ ला ७५ टक्के जळाल्याने तिला सा.रु. रुग्णालय भंडारा येथे औषधोपचारा करीता भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो. वरुन पो.स्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पो. शि. गठोड यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जा.फौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**८) अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी . :—**

दिनांक १९/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन आंधळगाव व भंडारा येथील अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५ लिटर हातभट्टी दारू किंमती २५०/—रूपया तसेच जुगारातुन किंमती २१२०/—रु असा एकुण किंमती २,४००/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

**९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक १९/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी ०७ तीन सिटर वाहनांवरती १८ केसेस व ईतर वाहनांवरती ९२ केसेस करण्यात आलेले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.